# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/04/2023 (बुधवार) सकाळ


### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई वाहनासह एकुण २०,२५,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १९/०४/२०२३ रोजी जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ हा शासकीय वाहनाने कन्हान उपविभागातील पोस्टे मौदा हद्दीमध्ये पोलीस निरीक्षक जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये पेट्रोलिंग व अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करणेकामी दिनांक १९/०४/२०२३ रोजी सकाळी ०६.५० वा. दरम्यान पेट्रोलिंग करत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, एक ट्रकमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील स्टाफ यांनी मौदा येथील बोरगाव पुलाजवळ नाकाबंदी करीत असतांना एक ट्रक प्राप्त माहितीप्रमाणे नागपूरचे दिशेने येतांना दिसुन आले. सदर ट्रकला थांबण्याचा इशारा देवुन थांबविले असता ट्रक क्र. एम. एच—३६/एफ—३०७५ यामध्ये चालक **आरोपी नामे— प्रशांत सुखदेव मारबते, वय ३५ वर्ष, रा. खैरी वेटाला ता. भंडारा जि. भंडारा** यास त्याचे ट्रकमध्ये असलेल्या मुद्देमालाबाबत विचारले असता, त्याने सदर ट्रकमध्ये रेतीचा मुद्देमाल भरल्याचे सांगितले. त्यास सदर रेतीबाबत परवाना रॉयल्टी विचारले असता त्याने त्याबाबत कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. सदर ट्रक कोणाचे मालकीचे आहे व त्याने सदर ट्रकमध्ये कोणाच्या सांगणेवरून चोरीची रेती ट्रकमध्ये भरून वाहुन नेत असल्याबाबत विचारणा केली असता स्वत: ट्रकमालक असुन स्वत:च अवैधरीत्या विनापरवाना चोरीची रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचेजवळुन रेतीसह एक पिवळया रंगाचा दहाचाकी ट्रक क्र. एम. एच.—३६/एफ— ३०७५ किंमती अंदाजे २०,००,०००/—रू. ज्यामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती भरलेली किमती अंदाजे २५,०००/—रू. असा एकुण वाहनासह २०,२५,०००/—रू. किंमतीचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— नापोशि/१९२७ शंकर मडावी वाहतुक शाखा नाग्रा. यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कारवाई करीता पोस्टे मौदा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे मौदा हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक श्री. विजय माहुलकर यांचे नेतृत्वात चालक सहायक फौजदार सुधीर यादव, चालक पोलीस हवालदार गुरूचरणसिंग जब्बल, पोलीस हवालदार मंगेश काळे, विजय तायडे, पोलीस नायक शंकर मडावी, प्रणय बनाफर, पोलीस शिपाई अमित मेहरे, कार्तिक पुरी, यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बेला :– यातील फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अप. क्र. ११/२०२० कलम ३६३, ३७६(२)(एन), ३७६ (३), ५०६ भादवि. सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीच्या अल्पवयीन बहिणीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद झाला होता. तपासा दरम्यान **आरोपी नामे– विशाल ज्ञानेश्वर क्षिरसागर, वय २४ वर्ष, रा. चिखली समुद्रपुर जि. वर्धा** याने फिर्यादीच्या अल्पवयीन बहिणी सोबत प्रेमसंबंध ठेवुन शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयामध्ये कलमवाढ करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक स्नेहल थोरात, पोस्टे बेला यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक १९/०४/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. जयस्वाल नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद तसेच ४ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिने साधी कैद. कलम ३६३ भादंवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व १०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद. कलम ५०६ भांदवि मध्ये ०३ महिने साधी कैद व ५००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा संजय इंगोले यांनी मदत केली आहे.

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील सुर्योदय नगरी ले आउट पारशिवनी ते आमडी रोड येथे दिनांक १६/०४/२०२३ चे १८/०० वा. ते दिनांक १७/०४/२०२३ चे ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सोनल विजय नोहा, वय ३८ वर्ष, रा. कांद्री माईन्स वार्ड क्र. ५ यांनी सुर्योदय नगरी ले आउट येथे लोखंडी पाण्याचे टॅकर ऑफीसचे बांधकामाकरीता उभा करून ठेवला असता नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील टॅकर क्र. ४ किंमती अंदाजे १२,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रवि बर्वे ब. नं. १४९० मो. नं. ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर :–** दिनांक ३१/११/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ चे ११/०० वा. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष हिचा **आरोपी नामे– समिर भंडारकर रा नांदोरी ता सावनेर** याने अल्पवयीन मुलीचा अज्ञातपणाचा फायदा घेवुन व प्रेमसंबंधातुन लग्नाचे आमिश दाखवुन वारंवार शारीरीक संबंध प्रस्तापित करून फिर्यादीला मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (आय) (जे) (एन) ५०६ भादवी सह कलम ४, ८, पोक्सो अधि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि कुमुदिनी पाथोडे मो. नं. ७८७५६८५१२५ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक १७/०४/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी वय ३९ वर्ष ही निसर्गबार ॲड रेस्टॉरन्ट मध्ये भांडे धुण्याचे व झाडण्याचे काम करते ती भांडे घासत असतांना बारमध्ये झगडा भांडणाचा आवाज येत होता झगडा करणारा व्यक्ती **आरोपी नामे– निलेश निळे, रा. खापा ता. सावनेर** हा भांडे घासण्याच्या ठिकाणी आला व लघवी करीत असता स्वयंपाक करणारा व्यक्ती त्याला म्हणाला तुला दिसत नाही का इथे बाई काम करीत आहे त्यावर याने त्याला सुध्दा शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली व फिर्यादीला म्हणाला तु माझ्यासोबत रूममध्ये चाल व हात पकडला लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ए) , ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. राठोड ७४२ मो. नं. ९८२०७४७४२ करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत संकेत लॉज सावनेर येथे दिनांक १७/०५/२०२३ चे १२.०० वा. ते १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— कालुराम दौलत मुसरे, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. १४ चिचपुरा सावनेर ता. सावनेर जि. नागपुर याचा मुलगा याने **आरोपी नामे— रोहीत बरघट रा कोराडी नांदा नागपुर** याचे सांगितल्यानुसार दहा चक्का टिप्पर लोनवर विकत घेतलेला होता व त्याचे मनानुसार रेतीचे ट्रिपवर चालवित होता. त्यादरम्यान आरोपी फिर्यादीच्या मुलास मानसिक त्रास देत असल्यामुळे त्रासाला कंटाळुन लॉज मध्ये गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम ३०६ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. राठोड/७४२ मो. नं. ९८२०७४७४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**